आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
२६ फेब्रुवारी २०२६ - गुरूवार

**ठळक बातम्या**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना इस्त्रायली संसदेचा 'स्पीकर ऑफ द नेसेट मेडल' हा सर्वोच्च सन्मान प्रदान

- राज्यसभेच्या ३७ जागांसाठी होणाऱ्या द्वैवार्षिक निवडणुकीची अधिसूचना निवडणूक आयोगाकडून जारी, राज्यातल्या सात जागांचा समावेश

- महाराष्ट्र ही देशातली सर्वात मोठी अर्थव्यवस्था असून २०३२मध्ये ती एक ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था बनेल असा मुख्यमंत्र्याचा विश्वास

**आणि**

- टी-ट्वेन्टी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत वेस्ट इंडिज आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात अहमदाबाद इथे सामना सुरू

<><><><><>

कोणत्याही प्रकारचा दहशतवाद हा जगातल्या शांततेसाठी धोकादायकच आहे. या संकटाचा सामना करण्यासाठी भारत वचनबद्ध असून दहशतवादाविरोधात इस्त्रायलनं पुकारलेल्या लढ्यात भारत त्यांच्याबरोबर खंबीरपणे उभा असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सांगितलं. ते इस्त्रायलच्या संसदेत बोलत होते. भारत-इस्त्रायल धोरणात्मक संबंध दृढ करण्यासाठी विशेष योगदान दिल्याबद्दल प्रधानमंत्री मोदी यांना इस्त्रायली संसदेनं 'स्पीकर ऑफ द नेसेट मेडल' हा सर्वोच्च सन्मान देऊन गौरवण्यात आलं. हा सन्मान मिळवणारे ते पहिले भारतीय पंतप्रधान ठरले आहेत.

इस्त्राइलच्या संसदेत केलेल्या भाषणाच्या प्रारंभी प्रधानमंत्री मोदी यांनी सर्वोच्च पुरस्कारानं सन्मानित केल्याबद्दल आभार मानले. हा गौरव एखाद्या व्यक्तीचा नसून भारत आणि इस्त्रायल यांच्यातील चिरस्थायी मैत्रीचा आहे. दोन्ही राष्ट्रांना मार्गदर्शक ठरणाऱ्या सामायिक मूल्यांचे हे प्रतीक आहे, अशा भावना त्यांनी व्यक्त केल्या.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी समाज माध्यमावर संदेश लिहून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं अभिनंदन केलं आहे.

आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
२६ फेब्रुवारी २०२६ - गुरूवार

**<><><><><>**

राज्यसभेच्या, महाराष्ट्राल्या सात जागांसाठी येत्या १६ मार्चला निवडणूक होणार आहे. राज्यातल्या सात सदस्यांचा कार्यकाळ येत्या २ एप्रिलला संपत आहे. त्या रिक्त होणाऱ्या जागांसाठी या निवडणुकांची अधिसूचना आज जारी करण्यात आली. उमेदवारी अर्ज ५ मार्चपर्यंत दाखल करता येतील. अर्जदारांची छाननी ६ मार्चला होईल. ९ मार्चपर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेता येतील. निवडणूक लढवली गेली तर १६ मार्चला सकाळी ९ ते संध्याकाळी ४ वाजेपर्यंत मतदान घेतलं जाईल.

**<><><><><>**

राज्यातल्या १२ जिल्हा परिषदा आणि सव्वाशे पंचायत समित्यांमधली अध्यक्ष तसंच सभापतीपदाची निवडणूक प्रक्रिया २० मार्चच्या आधी पूर्ण करायचे निर्देश ग्रामविकास विभागाने दिले आहेत. महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समित्या अधिनियमातल्या तरतुदींनुसार निवडून आलेल्या सदस्यांचा कार्यकाळ पहिल्या बैठकीपासून सुरू होतो. नवनिर्वाचित सदस्यांच्या पहिल्या सभेची बैठक वीस मार्चपूर्वी घ्यायचे आदेश ग्रामविकास विभागाने जारी केले आहेत.

**<><><><><>**

महाराष्ट्र ही देशातली सर्वात मोठी अर्थव्यवस्था असून २०३२ मध्ये ती एक ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था बनेल असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. विधानसभेत राज्यपालांच्या अभिभाषणावरील आभार प्रस्तावावरील चर्चेला ते आज उत्तर देत होते. राज्याची अर्थव्यवस्था गेल्या अकरा वर्षांत १३ लाख कोटींवरून वाढून ५१ लाख कोटींवर गेली आहे, म्हणजे अर्थव्यवस्थेत तिप्पट वाढ झाली आहे, असं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. तसंच महाराष्ट्र तीस लाख कोटींचं जीएसटी संकलन करतो, देशाच्या जीएसटीतला वाटा चालू आर्थिक वर्षात १४ टक्क्याच्या आसपास राहील असं मुख्यमंत्री म्हणाले.

दावोस मध्ये झालेल्या करारांपैकी ७५ टक्के करारांची अंमलबजावणी होते. २०२५ मध्ये झालेल्या करारांपैकी ८२ टक्के करारांची अंमलबजावणी होत आहे, असं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. यात ८३ टक्के परकीय गुंतवणुकीचा समावेश असून देशातील एकूण परकीय गुंतवणुकीच्या ३९ टक्के गुंतवणूक महाराष्ट्रात होते असं त्यांनी नमूद केलं. राज्याचा

बेरोजगारी दर २०२५-२६ मध्ये ३ टक्क्यांपर्यंत खाली आला आहे, असंही मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

<><><><><>

राज्य विधानसभेत आज पुरवणी मागण्यांवरच्या चर्चेला सुरुवात झाली. यंदा पुरवणी मागण्या अकरा हजार कोटींवर आल्या. श्रावण बाळ योजना, संजय गांधी निराधार योजना, शिवभोजन योजना अशा योजनांसाठी निधी मिळत नाही. जिल्हा परिषद शाळा बंद पडत आहेत, अनेक शाळांत शिक्षक नाहीत, स्पर्धा परीक्षेची तयारी करण्यासाठी ट्रेनिंग सेंटर नाही अशा तक्रारींचा पाढा कॉंग्रेस नेते नितीन राऊत यांनी वाचला.  या विभागांना तात्काळ निधी उपलब्ध करून द्यावा अशी मागणी त्यांनी केली.

सारथी योजनेअंतर्गत आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये ३८८ विद्यार्थ्यांना ७ कोटी २४ लाख रुपये शिष्यवृत्तीची रक्कम वितरित झाली. शिष्यवृत्तीप्राप्त उर्वरित ३७९ विद्यार्थ्यांसाठीची ५ कोटी ९६ लाख रुपये शिष्यवृत्तीची रक्कम  ३१ मार्च पर्यत वितरीत करावी अशा सूचना दिल्या आहेत असं सरकारकडून विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासाला सांगण्यात आलं. जयंत पाटील, अभिजित पाटील यांनी यासंदर्भात प्रश्न उपस्थित केला होता. ही योजना पुढेही सुरू राहील असं सरकारने स्पष्ट केलं.

<><><><><>

टी-ट्वेन्टी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेच्या सुपर एट चा पहिल्या गटाच्या सामन्यांमध्ये आज भारत आणि झिम्बाब्वे यांच्यादरम्यान सामना होणार आहे. चेन्नईत एमए चिदंबरम मैदानावर आज संध्याकाळी  ७ वाजता हा सामना सुरु होईल. भारताला उपान्त्य फेरीत स्थान मिळवण्यासाठी आजचा सामना तसंच येत्या रविवारचा वेस्ट इंडिजबरोबरचा सामना या दोन्हीमध्येही विजय मिळवणं आवश्यक आहे.

गट एकच्या दुसऱ्या सामन्यांमध्ये आज वेस्ट इंडिज आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात अहमदाबाद इथं नरेंद्र मोदी मैदानावर सामना सुरू आहे. दक्षिण आफ्रिकेनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

<><><><><>

रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेचा अंतिम सामना कर्नाटकात हुबळी इथे जम्मूकाश्मीर आणि कर्नाटक यांच्या दरम्यान सुरू आहे. सामन्याच्या आजच्या तिसऱ्या दिवशी जम्मू-काश्मीर संघाच्या पहिल्या डावात ५८४ धावा झाल्या.

शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा कर्नाटक संघाच्या ४ बाद १३० धावा आल्या होत्या.

<><><><><>

एनसीईआरटी अर्थात राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेच्या आठवीच्या पुस्तकामध्ये न्यायालयीन यंत्रणेतल्या भ्रष्टाचाराबद्दल असलेल्या मजकुरासंदर्भात सर्वोच्च न्यायालयाने एनसीईआरटीच्या संचालकांना तसंच शालेय शिक्षण मंडळाला कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. तसंच, न्यायालयानं या पुस्तकावर सर्वंकष बंदी घालत पुस्तकाच्या सर्व मुद्रित प्रती जप्त करण्याचे आणि त्याच्या डिजिटल आवृत्त्या तात्काळ हटवण्याचे आदेश दिले आहेत. केंद्र आणि राज्य सरकारांना या आदेशांचं तातडीनं पालन करण्याच्या सूचना दिल्या असून आदेशाचं उल्लंघन झाल्यास कठोर कारवाईचा इशारा सर्वोच्च न्यायालयानं दिला आहे. या प्रकरणी एनसीईआरटीने दिलगिरी व्यक्त न करता कृतीची भलावण केल्याबाबतही न्यायालयाने नाराजी व्यक्त केली आहे.

<><><><><>

पुण्यातल्या पोर्श अपघात प्रकरणी अल्पवयीन आरोपीचे वडील, विशाल अग्रवाल अंतरिम जामीन अर्ज आज सर्वोच्च न्यायालयानं फेटाळला. आरोपीचे वकील मुकुल रोहतगी यांनी अग्रवालच्या अंतरिम जामिनाची विनंती केली होती.

पुण्यात १९ मे २०२४ ला झालेल्या पोर्श अपघातात दोन जणांचा जागीच मृत्यू झाला होता. ही गाडी अल्पवयीन मुलगा चालवत होता. या अपघातानंतर मुलाच्या रक्त चाचणी अहवालात फेरफार केल्याचा आरोप विशाल अग्रवाल यांच्यावर ठेवला आहे. न्यायमूर्ती बी. व्ही नागरत्ना आणि न्यायमूर्ती उज्ज्वल भूयान यांच्या पीठासमोर पुढची सुनावणी ३ मार्चला होणार आहे.

<><><><><>

स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त आज त्यांना अभिवादन करण्यात येत आहे. सावरकरांनी देशाला गुलामगिरीच्या साखळ्यांपासून मुक्त करण्यासाठी

आपलं जीवन समर्पित केलं, त्यांचं व्यक्तिमत्व आणि कार्य प्रत्येक पिढीला राष्ट्रसेवेसाठी प्रेरणा देत राहील, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

अस्पृश्यता निवारण आणि स्त्री शिक्षणासाठी आयुष्यभर लढा देणाऱ्या वीर सावरकरांच्या त्याग, समर्पण आणि वीरतेच्या गाथा अनंत काळापर्यंत प्रत्येक राष्ट्रप्रेमीसाठी राष्ट्रप्रथम या विचारांचा दीपस्तंभ ठरतील, अशा शब्दात गृहमंत्री अमित शहा यांनी सावरकरांना आदरांजली वाहिली.

जाज्वल्य राष्ट्रभक्तीचा हुंकार, थोर क्रांतिकारक, हिंदुत्ववादी विचारांचे विद्यापीठ स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांना पुण्यतिथीदिनी कोटी कोटी नमन…अशा शब्दात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सावरकरांना आदरांजली वाहिली आहे.

//<><><><><>//